**नियमित दरखास्त क्र. ६४/२००१**

## निशाणी क्र. ३४ खालील आदेश
## (दिनांक १२ डिसेंबर २०१७)

१. प्रस्तुतचा अर्ज ति–हाईत इसम दशरथ दिनकर भगत व इतर ६ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २१ नियम ९७ व कलम ४७ प्रमाणे दावा मिळकत गट क्र. १६० चे वाटप करु नये तसेच नियमित दिवाणी अपिल क्र. १०२/२०११ मधिल निकालापर्यंत अंमलबजावणी स्थगित ठेवण्यात यावी यासाठी दिला आहे.

२. अर्जातील कथनानुसार मुळ दावा रे. मु. नं. ८२/१९७८ मधिल वादी व प्रतिवादींनी वडिलोपार्जित मिळकतीसाठी वाटपाचा दावा दाखल केला. सदर दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जदारांना पक्षकार केले नव्हते. सदर दावा दिनांक ३०.०६.१९८६मंजूर करण्यात आला. सदर दाव्यामध्ये प्रतिवादींनी खरेदी केलेली गट क्र. १६० ही मिळकत त्यांच्या परस्पर समाविष्ट करण्यात आली. सदरवेळी केवळ फेरफार क्र. १२५२ दाखल करण्यात आला होता. वादी व प्रतिवादींनी न्यायालयाची दिशाभूल करुन हुकूमनामा मिळविलेला आहे. प्रस्तुत अर्जदारांनी सदर मिळकत दिनांक ०४.०५.१९८३ रोजी खरेदी केली असून आजअखेर त्यांच्या कब्जेवहिवाटीस आहे. सदर दाव्यातील हुकूमनामा अंमलबजावणीसाठी प्रस्तुत दरखास्त दाखल करण्यात आली असून तहसिलदार व भुमि अभिलेख यांच्याकडे वाटपासाठी पाठविण्यात आलेली आहे. दावा मिळकत अर्जदारांच्या ताबेवहिवाटीस असताना वाटप करता येणार नाही. वादी, प्रतिवादी व अर्जदार यांच्यामध्ये दावा मिळकतीबाबत रे. मु. नं. ६०/२००० हा दावा दाखल होता. सदर दाव्यातील आदेशाविरुध्द अर्जदारांनी नियमित दिवाणी अपिल क्र. १०२/२०११ दाखल केले असून ते प्रलंबित आहे. वादी व प्रतिवादींनी दावा मिळकतीचे वाटप केल्यास अर्जदारांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

३. दरखास्तदार व जाबदेणार यांनी निशाणी क्र. ४०कडे म्हणणे देवून सर्व

कथनांचा इन्कार केला. त्याच्या कथनानुसार अर्जदारांना मुळ दाव्याची माहिती होती. अर्जदारांनी याच न्यायालयात रे.मु.नं. १२/२०११ दावा दाखल केला होता परंतू त्यातील निशाणी क्र. ५कडील अर्ज नामंजूर झाल्यानंतर दावा मागे घेण्यात आला. मुळ दाव्यातील हुकूमनामा वरिष्ठ न्यायालयाने आजअखेर स्थगित केलेला नाही. दावा मिळकत गट क्र. १६० मयत भगवान शितोळे यांना मिळाली होती. सदर मिळकतीचे अर्जदार यांनी दावा प्रलंबित असताना बेकायदेशिर खरेदीखत करुन घेतले त्यामुळे सदर खरेदीखतास मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ ची बाधा येते. दावा मिळकत अर्जदार यांच्या ताबेवहिवाटीस नाही. अर्जदार हे केवळ हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस अडचण निर्माण करण्यासाठी अर्ज देत असून तो नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

४. अर्जदार यांच्यातर्फे निशाणी क्र. २८८कडे लेखी युक्तिवाद दिला आहे. त्याचे वाचन केले. दरखास्तदार तर्फे श्री एल.एफ. सय्य्द तर जाबदेणार यांच्यातर्फे श्री खोलम वकीलांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांची पडताळणी केली. पुढील मुद्दे उपस्थित होता. त्याचे निष्कर्ष मी कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा अर्ज आहे त्या परिस्थितीमध्ये मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | नकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्या क्र. १ व २ करीता

५. अर्जदारांनी अर्जातील कथनांच्या शाबीतीसाठी निशाणी क्र. ७९कडे शिवाजीराव दिवेकर यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. साक्षीदाराने उलटतपासात मान्य केले की दावा मिळकत गट क्र. १६० बाबत महसूल कार्यालयात

दरखास्तदार, जाबदेणार व त्यांच्यामध्ये सन १९८३ सालापासून वाद चालू होते. साक्षीदाराने मान्य केले की त्याने रे. मु. नं. १२/२०११ दावा दाखल केला होता व त्यातील मनाई अर्ज नामंजूर झाला असून सदर दावा मागे घेण्यात आला. साक्षीदाराने मान्य केले की दावा मिळकतीच्या सातबारापत्रकी कब्जेदार म्हणून अर्जदारांची नोंद झालेली नाही. साक्षीदाराने सन १९८२–१९८३ च्या सातबारापत्रकी भगवान गुलाब शितोळे यांच्या नावाची नोंद नसल्याचे मान्य केले. भगवान शितोळे यांचे खरेदीखत न्यायालयाने रद्द केलेले नाही. इतर सूचक प्रश्नांना त्याने नकाराथी उत्तर दिले.

६. दरखास्तदार बाजीराव शितोळे यांनी निशाणी क्र. ९८कडे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. उलटतपासात साक्षीदाराने मान्य केले की, फेरफार क्र. १७९ रद्द झाला आहे. भगीरथ लोणकर व भगवान शितोळे यांच्यामध्ये रे. मु. नं. ६५/१९६५ दावा दाखल झाला होता. साक्षीदाराने फेरफार क्र. १७९ विरुध्द अपिल केले नसल्याचे मान्य केले. साक्षीदाराने बहुतांश प्रश्नांना माहिती नाही असे उत्तर दिले आहे. दावा मिळकत अर्जदार यांनी खरेदी केल्याचे त्याने अमान्य केले. इतर सर्व सूचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले.

७. उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी करता प्रस्तुत दरखास्त रे. मु. नं. ८२/१९७८ मधिल हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी दाखल करण्यात आली आहे. अर्जदार यांच्या आक्षेपानुसार दावा मिळकत गट क्र.१६० ही त्यांच्या सन १९८३सालच्या खरेदीखताने कब्जेवहिवाटीस असून त्यांना प्रकरणात समाविष्ट न करता हुकूमनामा पारीत झालेला आहे. प्रस्तुत अर्जाची मुळ मागणी पाहता केवळ नियमित दिवाणी अपिल क्र. १०२/२०११ मधिल निकालापर्यंत अंमलबजावणी स्थगित करण्यात यावी अशी आहे. उपलब्ध कागदपत्रे पाहता मयत भगवान शितोळे यांनी सन १९५० साली मिळकत खरेदी केली होती. परंतू त्यानुसार झालेला फेरफार क्र. १७९ रद्द करण्यात आला. तीच मिळकत अर्जदार यांनी सन १९८३साली खरेदी केली आहे.

८ दरम्यान भगीरथ लोणकर यांनी भगवान शितोळे व इतर यांचेविरुध्द वाद

मिळकतीबाबत रे. मु.नं. ६५/१९६५ हा दावा ताबा मिळावा म्हणून दाखल केला होता. परंतू तो नामंजूर करण्यात आला. अर्जदार यांना रघुनाथ सोनार यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत करुन दिले असून त्यानुसार फेरफार क्र.३७९, ३५५ मंजूर करण्यात आला. वरील दोन्ही फेरफार दावा मिळकत पूर्वी भगवान शितोळे यांना विक्री करण्यात आली होती या कारणावरुन रद्द करण्यात आले आहे. भगवान शितोळे यांनी प्रस्तुत अर्जदार यांचेविरुध्द रे.मु.नं. ७७/१९८३ हा दावा मालकी हक्क जाहीर होवून मिळणेसाठी व मनाईसाठी दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल पाहता भगवान शितोळे यांनी ताबा सिध्द केला परंतू मालकी हक्क सिध्द करण्यासाठी खरेदीखत दाखल केले नाही व जे खरेदीखत झाले ते परवानगी अभावी बेकायदेशिर धरण्यात आले. अगदी त्याचप्रमाणे प्रस्तुत अर्जदार यांचे खरेदीखत सुध्दा परवानगी अभावी बेकायदेशिर धरण्यात आले. शेवटी सदर दावा नामंजूर करण्यात आला.

९. सर्व पक्षकारांना मान्य असल्याप्रमाणे मुळ दाव्यातील हुकूमनामा ना. मुंबई उच्च न्यायालयापर्यंत कायम झालेला आहे. दरखास्तदार, जाबदेणार व अर्जदार यांच्यामध्ये ताबेवहिवाटीवरुन तथा मालकी हक्कावरुन सन १९८३सालापासून वाद चालू असल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. भगवान शितोळे यांच्या वारसांनी महाराष्ट्र शासन, अर्जदार व जाबदेणार यांचेविरुध्द रे.मु.नं. ६०/२००० हा दावा बारामती येथील न्यायालयात विरुध्द हक्काने मालकी जाहीर होवून मिळणेकामी दाखल केला होता. सदर प्रकरणातील निशाणी क्र. १४५कडील निकाल पाहता पूर्वी झालेल्या सर्व प्रकरणांचा उहापोह त्यामध्ये करण्यात आला आहे. सदर निकालाप्रमाणे दावा मिळकतीचा ताबा मयत भगवान शितोळे यांच्या वारसांचा असल्याचे निष्कर्ष काढण्यात आले. तसेच प्रस्तुत अर्जदार यांचेविरुध्द मनाई हुकूम देण्यात आला. सदर निकाल दिनांक ३०.०६.२०११ रोजी देण्यात आला आहे. प्रस्तुत निकालाविरुध्द अर्जदार यांनी नियमित दिवाणी अपिल क्र. १०२/२०११ दाखल केले असून ते प्रलंबित आहे.

१०. वरील सर्व परिस्थितीचा विचार करता अर्जदार यांना दावा मिळकतीबाबत तथा मुळ दाव्याबाबत पूर्वीपासून माहिती होती हे स्पष्ट होते. तसेच मयत भगवान शितोळे यांचे सन १९५०सालचे खरेदीखत परवानगी अभावी बेकायदेशिर धरण्यात

आले असून अगदी त्याच पध्दतीने अर्जदार यांची खरेदीखतेसुध्दा परवानगी अभावी बेकायदेशिर धरण्यात आली असून त्याचे फेरफार रद्द करण्यात आले आहेत. अशा परिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज दाखल केला त्यावेळी दावा मिळकत गट क्र. १६० अर्जदार यांच्या कब्जेवहिवाटीस होती हे सिध्द होत नाही. तसेच मालमत्ता हस्तांतरण कायदा कलम ५२ नुसार जर मुळ दाव्याची अर्जदार यांना माहिती होती तर झालेला हुकूमनामा त्यांचेवर बंधनकारक ठरतो. अर्जदार यांनी दाखल केलेल्या **श्रीनाथ व इतर विरुध्द राजेश व इतर या अे. आय. आर . १९९८ सर्वोच्च न्यायालय १८२७** या न्यायनिवाडयानुसार ति–हाईत इसम दावा मिळकतीचा कब्जा त्यांच्याकडे असल्याचे सांगत असतील तर दरखास्तदाराने तो कब्जा काढून घेइपर्यंत त्यांनी वाट पाहण्याची गरज नाही. वरीलप्रमाणे अर्जदार हे प्रस्तुत दरखास्तीच्याकामी अर्ज देवू शकतात हे स्पष्ट होते. सदर न्यायानिवाडयाबाबत कोणाचेही दुमत नाही.

११. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्याकामी केलेली मागणी ही नियमित दिवाणी अपिल क्र.१०२/२०११ मध्ये केलेली आहे. अशा परिस्थितीत सदर अपिलाचा निकाल होईपर्यंत दरखास्त स्थगित ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. तसेच पूर्वी झालेल्या न्यायलयीन प्रकरणांमध्ये दावा मिळकतीचा ताबा अर्जदार यांच्याकडे असल्याचे सिध्द झालेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज आहे त्या परिस्थितीत चालणेस पात्र नसल्यामुळे मी मुद्या क्र. १चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून मुद्या क्र. २ करीता पुढील आदेश देत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

(सुमित वि. जोशी)
सह दिवाणी न्यायाधीश,
कनिष्ठ स्तर , दौंड

दौंड
दिनांक–१२.१२.२०१७

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | : Smt.S.V. Hirve |
| Court Name | : S.V. Joshi |
| | : Jt. Civil Judge J.D., Daund. |
| Date of Judgment | : 12.12.2017 |
| Judg. signed by P. O. | : 12.12.2017 |
| Uploaded on | : 26.12.2017 |